Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली

एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – पाचवी ( 11 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस बेचाळीस :

CLICK HERE



टेस्ट सोडवा

पाठ वाचा व सराव करा.

वाघाच्या ठशावरून तो वाघाचा आहे का वाघिणीचा आहे, हेही ओळखता येते. वाघ-वाघिणीचे पुढचे पाय चौकोनी असतात; परंतु त्यांच्या मागच्या पंजांत फरक असतो. वाघाचा पंजा चौकोनी असतो. त्याची लांबी-रुंदी सारखी असते; परंतु वाघिणीच्या मागच्या पायाचा तळवा आयताकृती असतो. रुंदीपेक्षा त्याची लांबी जास्त असते.

नर-मादीच्या पावलांचे ठसे जवळजवळ दिसल्यास ते दोघे बरोबर होते, असे समजायला हरकत नाही. ज्या प्राण्यांच्या पायांच्या नख्या बाहेर आलेल्या असतात, त्यांच्या पंजाच्या ठशात बोटांबरोबर नख्याही उमटलेल्या दिसतात.

तरसाचा ठसा तीन इंच लांब असतो. जंगली कुत्र्याचा ठसा सुबक दिसतो. त्याच्या पंजाचा तळवा व चार बोटे नख्यांसह मातीत उमटलेली दिसतात. चारही बोटांत अंतर असते. तळवा व बोटे यातही अंतर असते.

अस्वलाच्या पायाचा ठसा माणसाच्या पायाच्या ठशासारखा दिसतो. बोटाबरोबर त्याच्या पाचही लांब नख्या ठशात उमटलेल्या असतात.

खूर असलेल्या प्राण्यांचे ठसेही पाणवठ्यावर, मातीत पाहायला मिळतात. ओलसर मातीत वा कोरड्या मातीत ठसे चांगले दिसतात. चिखलात खोल पाय रुतत असल्याने ठसे पूर्णपणे दिसत नाहीत.

गव्याच्या खुरांचा ठसा मोठा असतो. तो सहा इंच भरतो. पाळीव गुरांच्या खुरासारखा दिसतो.

हरणाच्या खुरांचा ठसा लहान असतो. त्याच्या खुरांच्या दोन अर्धवर्तुळाकार भागाच्या खुणा जवळ जवळ दिसतात. सांबर, बाराशिंगा, चौशिंगा, चिंकारा व काळवीट यांच्या खुरांचे ठसे कमी-जास्त आकारांचे असतात. भेकराच्या खुराचा ठसा अवघा एक ते सव्वा इंच असतो.

एकंदरीत वन्य प्राण्यांच्या ठशांवरून आपल्याला प्राण्यांची बरीच माहिती मिळते. त्यावरून प्राणी कोणत्या दिशेला गेला ते कळते. काही प्राण्यांच्या ठशांवरून तो नर होता की मादी होती, ते समजते. चालताना त्यांचा मागचा पाय पुढच्या पायाच्या ठशावर पडत असतो. त्यामुळे एकच ठसा उमटलेला दिसतो; परंतु पळताना मागील व पुढील दोन्ही पायांचे ठसे दिसतात. त्यावरून तो चालत गेला, की पळत गेला ते कळते. दोन्ही पायांच्या ठशांमधील अंतर जेवढे कमी तेवढा तो वेगात पळत गेला असे समजावे. वन्य प्राण्यांच्या ठशांचे निरीक्षण करणे मजेशीर असते त्यात वेळ कसा जातो ते समजत नाही.

काही प्राणी ठराविक ठिकाणीच विष्ठा टाकतात. विष्ठेचा आकार, रंग यांवरून ते प्राणी चटकन ओळखता येतात.

काही प्राण्यांच्या विष्ठेत शिकार केलेल्या प्राण्यांचे न पचलेले भाग- जसे केस, नखे व हाडे आढळून येतात. त्या निरीक्षणावरून ती शिकार कोणत्या प्राण्याची असेल हे ओळखता येते.

जंगलातून फिरताना आपल्याला अनेक आवाज ऐकू येतात. उंच उंच गवतातून पाण्याकडे येणारे हिंस्र प्राणी पाहून पक्षी मोठ्याने आवाज करत उंच उडतात, तर शिकार होणारे प्राणी- जसे हरिण, सांबर व काळवीट मोठ्या आवाजात ओरडत धोक्याची सूचना देतात.

वन्य प्राण्यांच्या पावलांचे ठसे, शिकार करण्याची पद्धत, विष्ठा व झाडा-झुडपांवरील त्यांच्या नख्यांच्या खुणा, दातांच्या खुणा, त्यांचे विविध आवाज यांवरून त्यांची आपल्याला ओळख होते. ही एक प्रकारची अरण्यलिपीच होय.

जंगलवाचनाचा आपल्याला छंद लागला, की डोळ्यांनी, कानांनी, नाकाने आपण प्राण्यांच्या अनेक गोष्टी जाणतो. प्राण्यांचे आवाज, पायांचे ठसे, वास आपल्याला प्राण्यांच्या जगाशी एकरूप करतात. ओढा, नदीकाठ, माळरान, डोंगरदऱ्या, ओहळ, झाडेझुडपे या सगळ्यांशी जवळीक निर्माण होते. कुठलेही जंगल आपल्याला कंटाळवाणे वाटत नाही. कारण जंगलवाचनाचा अनुभव आपल्याला नवीनवी माहिती आणि वेगळ्याच स्वरूपाचा आनंद मिळवून देतो.

– सुरेशचंद्र वारघडे

➕ खालील भागाकार समजून घ्या. **4. गुणाकार व भागाकार**

टेस्ट सोडवा

## सराव

6. एक वही तयार करण्यास 48 कागद लागतात, तर 5880 कागदांच्या किती वह्या होतील? किती कागद उरतील?
7. पाच अंकी सर्वांत लहान संख्येला चार अंकी सर्वांत लहान संख्येने भागल्यास भागाकार किती येईल ?

### मिश्र उदाहरणे

एका शेतकऱ्याने मिरचीच्या रोपांचे 140 ट्रे आणले. प्रत्येक ट्रेमध्ये 24 रोपे होती. त्याने एका ओळीत 32 याप्रमाणे ती सर्व रोपे आपल्या शेतात लावली, तर त्या रोपांच्या किती ओळी झाल्या ?

एका ट्रेमध्ये 24 रोपे, अशा 140 ट्रेमधील रोपांची एकूण संख्या काढू. यासाठी 140 व 24 यांचा गुणाकार करू.

$$\begin{array}{r} 140 \\ \times\ 24 \\ \hline 560 \\ +\ 2800 \\ \hline 3360 \end{array}$$

एकूण रोपे 3,360.

एका ओळीत 32 रोपे, याप्रमाणे 3,360 रोपांच्या किती ओळी झाल्या, हे काढण्यासाठी 3,360 ला 32 ने भागू.

$$\begin{array}{r} 105 \\ 32\overline{)\,3360} \\ -\ 32 \\ \hline 016 \\ -\ 00 \\ \hline 160 \\ -\ 160 \\ \hline 000 \end{array}$$

भागाकार 105 आला. म्हणून त्या रोपांच्या 105 ओळी झाल्या.

105 × 32 हा गुणाकार करा व ताळा करून पाहा.

### उदाहरणसंग्रह 16

1. आबांनी 10,000 रुपयांपैकी 7,000 रुपये शाळेला देणगी दिली. उरलेली रक्कम प्रत्येक इयत्तेत सर्वांगीण प्रगती दाखवणारा एक याप्रमाणे सहा विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून समान वाटण्यास सांगितले, तर त्या प्रत्येक विद्यार्थ्याला किती रुपयांचे बक्षीस मिळेल ?
2. सहलीसाठी 50 मुलांकडून प्रत्येकी 260 रुपये वर्गणी जमा केली. त्यांपैकी 11,450 रुपये सहलीसाठी खर्च झाला, तर किती रुपये शिल्लक राहिले ?
3. एका दुकानदाराने साखरेचे 50 किग्रॅ वजनाचे पोते 1750 रुपयांस आणले. साखरेचा भाव कमी झाल्यामुळे त्याला ती साखर प्रति किग्रॅ 32 रुपये दराने विकावी लागली, तर त्याला किती रुपये कमी मिळाले ?
4. दुकानदाराने 1870 रुपयांस एक याप्रमाणे 7 कुकर खरेदी केले. ते सर्व कुकर 14,230 रुपयांस विकले, तर त्याला किती रुपये जास्त किंवा कमी मिळाले ?
5. एका सोसायटीतील 14 कुटुंबांनी मिळून गव्हाची प्रत्येकी 98 किलोग्रॅम वजनाची 8 पोती आणली. त्यातील गहू त्या सर्व कुटुंबांनी समान वाटून घेतला, तर प्रत्येक कुटुंबाच्या वाट्याला किती किलोग्रॅम गहू आला ?
6. एका इमारतीवरील टाकीची धारकता 3000 लीटर आहे. त्या इमारतीत 16 कुटुंबे राहतात. प्रत्येक कुटुंबाने रोज 225 लीटर पाणी वापरले, तर त्या टाकीतील पाणी सर्व कुटुंबांना पुरेल का ? पुरणार नसल्यास रोज किती पाणी कमी पडेल ?

◆◆◆

## Understand the following division. Revision

6. If 48 sheets are required for making one notebook, how many notebooks at the most will 5880 sheets make and how many sheets will be left over?
7. What will the quotient be when the smallest five-digit number is divided by the smallest four-digit number?

### Mixed examples

A farmer brought 140 trays of chilli seedlings. Each tray had 24 seedlings. He planted all the seedlings in his field, putting 32 in a row. How many rows of chillies did he plant?

Let us find out the total number of seedlings when there were 24 seedlings in each of the 140 trays. We shall multiply 140 and 24.

$$\begin{array}{r} 140 \\ \times\ 24 \\ \hline 560 \\ +\ 2800 \\ \hline 3360 \end{array}$$

Total number of seedlings 3,360.

To find out how many rows were planted with 32 seedlings in each row, we shall divide 3,360 by 32.

$$\begin{array}{r} 105 \\ 32\,\overline{)\,3360} \\ -\ 32 \\ \hline 016 \\ -\ 00 \\ \hline 160 \\ -\ 160 \\ \hline 000 \end{array}$$

The quotient is 105.

Therefore, the number of rows is 105.

Carry out the multiplication of 105 × 32 and verify your answer.

### Problem Set 16

1. From a total of 10,000 rupees, Anna donated 7,000 rupees to a school. The remaining amount was to be divided equally among six students as the 'all-round student' prize. What was the amount of each prize ?
2. An amount of 260 rupees each was collected from 50 students for a picnic. If 11,450 rupees were spent for the picnic, what is the amount left over ?
3. A shopkeeper bought a sack of 50kg of sugar for 1750 rupees. As the price of sugar fell, he had to sell it at the rate of 32 rupees per kilo. How much less money did he get than he had spent ?
4. A shopkeeper bought 7 pressure cookers at the rate of 1870 rupees per cooker. He sold them all for a total of 14,230 rupees. Did he get less or more money than he had spent?
5. Fourteen families in a Society together bought 8 sacks of wheat, each weighing 98 kilos. If they shared all the wheat equally, what was the share of each family?
6. The capacity of an overhead water tank is 3000 litres. There are 16 families living in this building. If each family uses 225 litres every day, will the tank filled to capacity be enough for all the families? If not, what will the daily shortfall be?

टेस्ट सोडवा

## listen and understand. Revision




1. Listen, repeat, sing and enact. ऐका, म्हणा. हे गाणे हावभावांसह म्हणा.

01

Found a peanut, found a peanut,
Found a peanut just now.
Just now, I found a peanut,
Found a peanut just now.





Cracked it open, cracked it open,
Cracked it open just now.
Just now, I cracked it open,
Cracked it open just now.

Ate the peanut, ate the peanut,
Ate the peanut just now.
Just now, I ate the peanut,
Ate the peanut just now.





Got a stomach ache, got a stomach ache,
Got a stomach ache just now.
Just now, I got a stomach ache.
Got a stomach ache just now.





Call the doctor, call the doctor,
Call the doctor just now.
Just now, call the doctor.
Call the doctor just now.

Operation, operation,
Operation just now.
Just now, operation,
Operation just now.



वाचा व समजून घ्या.

# ५. कुटुंबातील मूल्ये

टेस्ट सोडवा

## वाचा व चर्चा करा.

खालील संवाद वाचा. त्यातील वादाचा मुद्दा कोणता आहे, तो कसा सोडवला गेला याविषयी चर्चा करा.




### सहिष्णू वृत्ती

आपणां सर्वांमध्ये काही गुण-दोष असतात. पालकांच्या, मित्रमैत्रिणींच्या मदतीने आपल्यातील दोष दूर करता येतात. एकमेकांचे विचार प्रत्येक वेळी एकमेकांना पटतील असे नाही. आपल्या मित्रमैत्रिणींमध्ये कधीकधी मतभेद होतात. अशा वेळी आपलेच म्हणणे खरे आहे, असे न मानता इतरांचे म्हणणेही समजून घेतले पाहिजे. प्रसंगी दुसऱ्याचेही ऐकले पाहिजे. यातून सहिष्णुतेची भावना निर्माण होते व तिची जोपासना करता येते. आपल्यापेक्षा वेगळ्या मतांचा आदर करणे म्हणजे सहिष्णुता.

आपल्या देशात सहिष्णू वृत्तीला विशेष महत्त्व आहे. विविध धर्म, पंथ, परंपरा आणि रीतीरिवाज पाळणारे अनेक लोक इथे राहतात. त्यामुळे सर्वांनी सहिष्णुता बाळगण्याची आवश्यकता आहे. विविधतेचे जतन सहिष्णुतेमुळे होते. विविधता आपले सामाजिक जीवन समृद्ध करते. सहिष्णुता ही सामाजिक सलोख्याची पहिली पायरी आहे. ती आपल्याला इतरांचाही विचार सहानुभूतीने करायला लावते. आपल्या परिसरातील समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न आपण सहिष्णुतेमुळे करतो.

### स्त्री-पुरुष समानता

माणूस म्हणून मुलगा-मुलगी किंवा स्त्री-पुरुष समान असतात. त्यांचा दर्जा समान असतो. मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न करता दोघांनाही समान मानणे म्हणजे स्त्री-पुरुष समानता होय. मुलांनी व मुलींनी एकमेकांचा आदर केला पाहिजे. आपल्या मित्रमैत्रिणींच्या सहवासात आपण सगळे एकमेकांना सारखेच मानतो. ही समानतेची भावना पुढे आपण नागरिक म्हणूनही कायम ठेवली पाहिजे.

समानतेची भावना वाढीस लागल्यामुळे सर्वांना प्रगती करता येते, सर्वांना शिकता येते. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या स्त्री-पुरुषांच्या समान गरजा आहेत. समानतेसाठी या गरजांची सारखीच पूर्तता झाली पाहिजे. अशा सोईसुविधांवर स्त्री-पुरुषांचा समान अधिकार असतो. तसेच सर्व स्त्री-पुरुषांना प्रगतीची समान संधी मिळाली पाहिजे.

- **स्त्री-पुरुष समान असतात, या विषयावर घोषवाक्ये तयार करा.**

वाचा व समजून घ्या. सराव

टेस्ट सोडवा

# ४. उत्क्रांती


४.१ उत्क्रांतीची संकल्पना


४.२ प्राण्यांच्या उत्क्रांतीचे टप्पे

४.३ मानवसदृश वानर


## ४.१ उत्क्रांतीची संकल्पना

'उत्क्रांती' या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ 'सतत आणि संथ वेगाने होणारा बदल' असा होतो. सजीवांच्या जीवनातील उत्क्रांतीच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल : पर्यावरणातील बदलांशी जुळवून घेण्याच्या आणि आपले अस्तित्व टिकवून धरण्याच्या प्रयत्नात, एखाद्या विशिष्ट प्राणिजातीमधील प्राण्यांच्या शरीररचनेत काही अंतर्गत बदल घडून येतात. कालांतराने तेच बदल त्या प्राणिजातीच्या पुढील पिढ्यांमध्ये आनुवांशिकतेचे रूप धारण करतात. अशा तऱ्हेने मूळ प्राणिजातीपेक्षा काही वेगळी वैशिष्ट्ये असणारी एक नवीन प्रजाती उदयाला येते. ही नवीन प्रजाती मूळ प्राणिजातीपेक्षा अधिक उत्क्रांत असते. या प्रक्रियेत अनेकदा मूळ प्राणिजात नष्ट पावते. अनेकदा मूळ प्राणिजातीपासून एकापेक्षा अनेक उत्क्रांत प्रजाती निर्माण होतात. उत्क्रांतीची ही संकल्पना सुस्पष्ट स्वरूपात पहिल्यांदा मांडली, ती चार्ल्स डार्विन या शास्त्रज्ञाने.

ज्या प्रजाती बदलत्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यास सक्षम असतात, त्या टिकून राहतात. ज्या प्रजाती तसे करू शकत नाहीत, त्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत नष्ट होतात.पूर्वी पृथ्वीवर डायनोसॉर वर्गातील प्राण्याच्या अनेक महाकाय प्रजाती होत्या. या प्रजाती अचानक नष्ट झाल्या, असा



डायनोसॉरच्या विविध प्रजाती

टेस्ट सोडवा

● सुनो, दोहराओ और बताओ :

## रियाज



# १०. गड़ा धन



सुंदरपुर गाँव में रामदीन नामक किसान रहता था । उसके चार बेटे थे । रामदीन स्वयं तो बहुत परिश्रमी था पर उसके चारों बेटे बड़े आलसी थे । हर समय इधर–उधर बैठकर गप्पें मारा करते थे । रामदीन उनके इस अल्हड़पन से परेशान था । उसे हमेशा बेटों के भविष्य की चिंता सताया करती । वह दिन रात यही सोचा करता कि बेटे अपना पेट कैसे पालेंगे । एक रात वह इन्हीं विचारों में खोया था, तभी उसकी पत्नी ने झिझकते हुए उसे एक उपाय सुझाया । उपाय सुनकर वह कुछ देर सोचता रहा । फिर एकाएक खुशी से उछल पड़ा ।

अगली सुबह रामदीन ने अपने चारों बेटों को बुलाकर कहा, ‘‘मैं और तुम्हारी माँ अब बूढ़े हो गए हैं । हम दूर तीर्थयात्रा पर जा रहे हैं । मैंने खेत में धन गाड़कर छिपा रखा है । यदि कोई जरूरत पड़े तो उसे निकालकर उपयोग कर लेना ।’’ गड़े हुए धन की बात सुनकर बेटे खुश हो गए और उन्होंने अपने पिता जी को खुशी–खुशी तीर्थयात्रा पर जाने के लिए कह दिया । वे मन–ही–मन खुश हो गए कि अब कुछ दिनों तक पिता जी का बंधन भी उनपर नहीं होगा ।

रामदीन के जाने के बाद कुछ दिनों तक तो सब कुछ सामान्य चलता रहा पर उसके बाद



❑ विद्यार्थियों को कहानी सुनाएँ और दो–दो पंक्तियों का मुखर वाचन करके दोहरवाएँ । प्रश्न पूछें और उनसे उत्तर प्राप्त करें । श्रम के महत्त्व को समझाएँ । मित्रता संबंधी कहानी सुनाने के लिए प्रोत्साहित करें । विद्यार्थियों से फसलों के नाम कहलवाएँ ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here